जिल्हा परिषद तसेच मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू असलेली परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः अंनियो-३४१५/प्र.क्र.२७६/टिएनटी - ६
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२,
तारीख: १९ सप्टेंबर, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांकः अंनियो १००५/१२६/सेवा ४, दि.३१/१०/२००५.
२) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांकः अंनियो १००७/१८/सेवा ४, दि.७/७/२००७.
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांकः अंनियो १००६/(२३/०६)/माशि २, दि.२९/११/२०१०.
४) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः एसएसएन २०१२३/(१५४/१२)/माशि-२, दि.५/२/२०१३.
५) शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांकः अंनियो २०१२/प्र.क्र.९६/सेवा ४, दि.२७/८/२०१४.
६) शासन निर्णय वित्त विभाग, क्र.अंनियो२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा ४, दि.६/४/२०१५.
७) शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः अंनियो ३४१६/प्र.क्र.८६/टिएनटी-६, दि.२०/१२/२०१७.

प्रस्तावना

राज्यात केंद्र शासनाच्या धर्तीवर परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू करण्यात आल्याबाबत व त्याची कार्यपध्दती संदर्भाधीन अ.क्र. १ व २ येथील निर्णयान्वये वित्त विभागाने विशद केली आहे. संदर्भाधीन अ.क्र.३ व ४ येथील शासन निर्णयान्वये या विभागाने जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयात दि.१ नोव्हेंबर, २००५ रोजी व तद्नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. संदर्भाधीन अ.क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे यापुढे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे नामकरण राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) असे करण्यात आले आहे. संदर्भाधीन क्र.६ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भात राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-१ ची अंमलबजावणी करणेसाठी आवश्यक ती कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

या संदर्भात केंद्र शासनाने स्थापित केलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना विश्वस्थ मंडळ (NPS TRUST) यांच्या बरोबर तसेच केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA) म्हणून मे.एन.एस.डी.एल. ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्टक्चर लि. (National Security Depositories Limited e-governance infrastructure limited) यांच्याशी दि.१०/१०/२०१४ रोजी शासनाने करार केला आहे.

त्यामुळे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित पदावरील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयात दि.१ नोव्हेंबर, २००५ रोजी व तद्नंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करणे व राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या

स्तर-१ ची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

१. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित शाळेतील नियमित पदावरील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू होईल.

२. संबंधित कर्मचाऱ्यांची नियमित/मान्यताप्राप्त पद्धतीशिवाय इतर प्रकारे (उदा.कंत्राटी पद्धतीने, विशिष्ट सिमीत कालावधीकरिता एखाद्या प्रकल्पाकरिता, या प्रकल्पाच्या कालावधी पुरता किंवा इतर कोणत्याही अनियमीत पद्धतीने) नियुक्ती झाली असल्यास अशा कर्मचाऱ्यांस राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू राहणार नाही. सेवेत नियुक्त होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याची नियुक्ती विहित पद्धतीने, नियमित वेतनश्रेणीत असणाऱ्या नियमित पदावर शासनातील सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने झाली आहे, तसेच सदर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी १००% अनुदानावरील शाळेतील नियमित पदावर आहे, याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची राहील.

या योजनेची अंमलबाजवणी करण्याकरिता खालील कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा :-

३. **केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण (CRA) :-** मे.एन.एस.डी.एल.ई-गव्हर्नन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (National Security Depositories Limited -e-Governance Infrastructure Limited) हे केंद्रीय देखभाल अभिकरण म्हणुन काम पाहील. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक देणे, जमा होणाऱ्या रकमांप्रित्यर्थ अभिलेख जतन करणे, त्याचे परिरक्षण करणे आणि या संदर्भात निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण यांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसंदर्भातील नेमून दिलेली इतर सर्व कामे पार पाडण्याची जबाबदारी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांची राहील. त्याचप्रमाणे राज्य शासनाशी केलेल्या करारातील अटी व शर्तींचे पालन करण्याची जबाबदारी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांची राहील. केंद्रिय देखभाल अभिकरणाशी Single Point Contact म्हणून आयुक्त (शिक्षण) हे जबाबदार राहतील. आयुक्त (शिक्षण), या योजनेची अंमलबजावणी शिक्षण संचालक(प्राथमिक) व शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्यामार्फत करतील.

४. **राज्य नियंत्रण अधिकारी (SNO) :-** आयुक्त (शिक्षण) यांना राज्य नियंत्रण अधिकारी (SNO) म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे राज्य नियंत्रण अधिकारी (SNO) म्हणून नोंदणी करुन घ्यावी. योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वित्त विभागाच्या सल्ल्याने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने घेतलेले निर्णय राज्य नियंत्रण अधिकारी यांना बंधनकारक राहतील. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) कार्यालयात कार्यरत सहायक संचालक (लेखा) हे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसंदर्भात राज्य नियंत्रण अधिकारी (SNO) यांच्याकडे कार्यरत राहतील.

५. **जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी डीटीए (DTA), डीटीओ (DTO) व डीडीओ (DDO) :-** जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी खालीलप्रमाणे डीटीए (DTA), डीटीओ (DTO) व डीडीओ (DDO)

नियुक्त करण्यात येत आहेत. त्यांनी सोबत जोडलेल्या प्रमाणे अनुक्रमे N१, N२ व N३ नमुन्यामध्ये आवश्यक माहिती भरुन केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडे नोंदणी करुन घ्यावी.

शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी	डीटीए (DTA)	डीटीओ (DTO)	डीडीओ (DDO)
अनुदानित खाजगी प्राथमिक	विभागीय शिक्षण उपसंचालक	शिक्षणाधिकारी (प्राथमिक)	अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक)
अनुदानित खाजगी माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालय	विभागीय शिक्षण उपसंचालक	शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षण निरिक्षक बृहन्मुंबई	अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक)
जिल्हा परिषद	उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद		शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

केंद्रिय देखभाल अभिकरणास परिरक्षण शुल्क अदा करणे आणि एकूण योजनेची परिणामकारक अंमलबजावणी व संनियंत्रण याबाबतची जबाबदारी डीटीए (DTA) यांची असेल. या योजनेत डीटीओ (DTO) जमा झालेल्या रकमांचा ताळमेळ घेऊन कर्मचारीनिहाय अंशदान रकमेची मेळजुळणीDTA च्या सहमतीने नियमित स्वरुपात करेल. कपात अंशदानाची माहिती केंद्रिय देखभाल अभिकरण व विश्वस्त बँकेकडे पाठविणे आणि तक्रारींचे निवारण करणे याबाबतची जबाबदारी डीटीओ (DTO) यांची असेल.

सहायक लेखाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक) व सहायक लेखाधिकारी (शापोआ) हे राष्ट्रीय निवृत्ती वेतन संबंधित आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यासाठी संबंधित आहरण संवितरण अधिकारी (DDO) यांना सहकार्य करतील.

६. केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडे नोंदणी झाल्यानंतर त्यांच्याकडून प्राप्त होणारे सांकेतांक सुरक्षितरित्या जतन करून त्याच्या योग्य त्या वापराची जबाबदारी डीटीए (DTA), डीटीओ (DTO) व आहरण संवितरण अधिकारी (DDO) यांची राहील.

७. जिल्हा परिषद तसेच मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी नियमित वेतनश्रेणीत आल्याच्या दिनांकापासून त्याचा कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (Permanent Retirement Account Number-PRAN) प्राप्त करण्याचा अर्ज, सोबतचा विहित नमुना CSRF मध्ये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक / प्राचार्य यांचे मार्फत प्राप्त करुन घ्यावा. सदर अर्ज संबंधित डिटीओ (DTO) यांचेकडे जमा करुन कर्मचाऱ्याचे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत नोंदणीकरण करुन घ्यावी. तद्नंतर कर्मचाऱ्यांच्या अंशदान कपाती करण्यात याव्यात. याबाबतची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांची असेल.

८. **वर्गणीदार कर्मचाऱ्यांची राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत नोंदणी :-** जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १/१२/२०१९ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नोंदणी करण्याची पध्दत त्यापूर्वीच्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील पध्दतीपेक्षा वेगळी राहील. याबाबतचा तपशील पुढील प्रकारे आहे:-

(अ) (i) जिल्हा परिषदेच्या शाळेतील दिनांक ०१/१२/२०१९ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी :-

८.१. ज्यांची नोंदणी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत यापूर्वीच झाली असून ज्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना क्रमांक (PPAN) प्राप्त झालेला आहे अशा कर्मचाऱ्यांनी सीएसआरएफ (CSRF) या निवृत्तीवेतन निधि विनियामक व विकास प्राधिकरणाने (PFRDA) ठरवून दिलेल्या नमुन्यात सर्व माहिती परिपूर्णरित्या भरावी.

८.२. सदर सीएसआरएफ (CSRF) हा शालार्थ प्रणालीवर भरलेल्या माहितीवरुन आपोआप तयार होईल. यातील माहिती कर्मचाऱ्यांनी भरुन दिलेल्या सीएसआरएफ (CSRF) नमुन्याशी तुलना करुन माहिती तंतोतंत जुळत असल्याची मुख्याध्यापक यांनी खात्री करावी. तफावत आढळल्यास योग्य दुरुस्तीनंतर भरलेल्या सीएसआरएफ (CSRF) नमुन्याच्या तीन प्रती मुद्रित करुन घ्याव्यात. त्यावर योग्य ठिकाणी कर्मचाऱ्याचे छायाचित्र चिकटवून आणि कर्मचाऱ्याची स्वाक्षरी घेऊन तो नमुना संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (DDO) यांना सादर करावा. सदर नमुन्याच्या तीन प्रतींपैकी एक प्रत संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (DDO) यांनी त्यांच्या अभिलेखामध्ये कार्यालयीन प्रत म्हणून जतन करुन ठेवावी. उर्वरित प्रती संबंधित उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) यांच्याकडे पाठवाव्यात व उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) यांनी यापैकी एक प्रत कार्यालयाच्या अभिलेख्यात जतन करुन ठेवावी आणि दुसरी प्रत केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे पाठवावी. सदर अर्ज सादर करतांना त्या सोबत कर्मचाऱ्यांची नावे व त्यांचा परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना क्रमांक (PPAN) असलेली यादी सोबत जोडावी.

८.३ सर्व कर्मचाऱ्यांचे सीएसआरएफ (CSRF) नमुन्यातील अर्ज प्राप्त होईपर्यंत थांबू नये. अर्ज जसे प्राप्त होतील तसे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (DDO) यांनी उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) कडे व उप मुख्य लेखा वित्त अधिकारी (DTO) यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे यादीसह निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाने (PFRDA) नेमून दिलेल्या एस-५ नमुन्यात जोडून पाठवावेत. केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण अशा सर्व कर्मचाऱ्यांना कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (Permanent Retirement Account Number-PRAN) देईल.

वर दर्शविलेली सर्व कार्यवाही तात्काळ (दिनांक ३०/११/२०१९) पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

(ii) जिल्हा परिषदेच्या शाळेतील दिनांक १/१२/२०१९ पासून रुजू/सहभागी होणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी:-

८.४ दिनांक १/१२/२०१९ पासून जिल्हा परिषदेच्या १००% अनुदानित पदावर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (DDO) यांनी शालार्थ या संगणक प्रणालीत भरावी. संबंधित उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) यांना शालार्थ प्रणालीमध्ये उपलब्ध माहितीच्या आधारे CSRF नमुना प्राप्त होईल. संबंधित उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) शालार्थ प्रणालीवर सदर नमुना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन कामाच्या दिवसात मान्यता देतील. संबंधित उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) यांनी मान्यता दिल्यानंतर शालार्थ प्रणालीमध्ये अशा कर्मचाऱ्यांकरिता डीसीपीएस क्रमांक (PPAN) तयार होईल. याबाबत आवश्यक ते बदल शालार्थ प्रणालीमध्येही करण्यात यावेत.

८.५ सर्व कर्मचाऱ्यांचे सीएसआरएफ (CSRF) नमुन्यातील अर्ज प्राप्त होईपर्यंत थांबू नये. अर्ज जसे प्राप्त होतील तसे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (DDO) यांनी उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) कडे व उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी (DTO) यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे पाठवावेत. सदर अर्ज सादर करताना त्या

सोबत कर्मचाऱ्यांची नावे व त्यांचा परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना क्रमांक(PPAN) आलेली यादी सोबत जोडावी. सर्व अर्ज यादीसह केंद्रीय अभिलेख देखलभाल अभिकरणाकडे यादीसह निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणने (PFRDA) नेमून दिलेल्या एस-५ नमुन्यात जोडून पाठवावे. केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण अशा सर्व कर्मचाऱ्यांना कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (Permanent Retirement Account Number-PRAN) देईल.

(ब) (i)मान्यता प्राप्त व खाजगी १००% अनुदानित पदावर दिनांक ०१/१२/२०१९ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी :-

८.६ ज्यांची नोंदणी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजने अंतर्गत यापूर्वीच झाली असून ज्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना क्रमांक (PPAN) प्राप्त झालेला आहे अशा कर्मचाऱ्यांनी सीएसआरएफ (CSRF) या निवृत्तीवेतन निधि विनियामक व विकास प्राधिकरणाने (PFRDA) ठरवून दिलेल्या नमुन्यात सर्व माहिती परिपूर्णरित्या भरावी.

८.७ सदर सीएसआरएफ (CSRF) हा शालार्थ प्रणालीवर भरलेल्या माहितीवरुन आपोआप तयार होईल. यातील माहिती कर्मचाऱ्यांनी भरुन दिलेल्या सीएसआरएफ (CSRF) नमुन्याशी तुलना करुन माहिती तंतोतंत जुळत असल्याची प्राचार्य/मुख्याध्यापक यांनी खात्री करावी. तफावत आढळल्यास योग्य दुरुस्तीनंतर भरलेल्या सीएसआरएफ (CSRF) नमुन्याच्या तीन प्रती मुद्रित करुन घ्याव्यात. त्यावर योग्य ठिकाणी कर्मचाऱ्याचे छायाचित्र चिकटवून आणि कर्मचाऱ्याची स्वाक्षरी घेऊन तो नमुना संबंधित अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/ माध्यमिक) (DDO) यांच्याकडे सादर करावा. खाजगी अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सदर नमुन्याच्या तीन प्रतींपैकी एक प्रत संबंधित अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/ माध्यमिक) (DDO) यांनी त्यांच्या अभिलेखामध्ये कार्यालयीन प्रत म्हणून जतन करुन ठेवावी. उर्वरित दोन्ही प्रती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) (DTO) कडे पाठवाव्यात. संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) (DTO) यांनी यापैकी एक प्रत त्यांच्या अभिलेखात जतन करुन ठेवावी आणि दुसरी एक प्रत केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे पाठवावी.

८.८ सर्व कर्मचाऱ्यांचे सीएसआरएफ (CSRF) नमुन्यातील अर्ज प्राप्त होईपर्यंत थांबू नये. अर्ज जसे प्राप्त होतील तसे अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/ माध्यमिक) (DDO) यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) (DTO) कडे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) (DTO) यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे यादीसह निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाने (PFRDA) नेमून दिलेल्या एस-५ नमुन्यात जोडून पाठवावेत. केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण अशा सर्व कर्मचाऱ्यांना कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (Permanent Retirement Account Number-PRAN) देईल.

वर दर्शविलेली सर्व कार्यवाही तात्काळ (दिनांक ३०/११/२०१९) पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

(ii) मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावर दिनांक १/१२/२०१९ पासून रुजू/सहभागी होणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी :-

८.९ दिनांक १/१२/२०१९ पासून मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक) (DDO) यांनी शालार्थ या संगणक प्रणालीत भरावी. नमुना सीएसआरएफ(CSRF) ची प्रणालीतील माहिती संबंधित शिक्षणाधिकारी (DTO) यांना शालार्थ प्रणालीमध्ये उपलब्ध

होईल. संबंधित शिक्षणाधिकारी (DTO) शालार्थ प्रणालीवर सदर नमुना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन कामाच्या दिवसात मान्यता देतील. संबंधित शिक्षणाधिकारी (DTO) यांनी मान्यता दिल्यानंतर शालार्थ प्रणालीमध्ये अशा कर्मचाऱ्यांकरिता डीसीपीएस क्रमांक (PPAN) तयार होईल. याबाबत आवश्यक ते बदल शालार्थ प्रणालीमध्येही करण्यात यावेत.

८.१० सर्व कर्मचाऱ्यांचे सीएसआरएफ (CSRF) नमुन्यातील अर्ज प्राप्त होईपर्यंत थांबू नये. अर्ज जसे प्राप्त होतील तसे अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/ माध्यमिक) (DDO) यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) (DTO) कडे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) (DTO) यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे यादीसह निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाने (PFRDA) नेमून दिलेल्या एस-५ नमुन्यात जोडून पाठवावेत. केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण अशा सर्व कर्मचाऱ्यांना कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (Permanent Retirement Account Number-PRAN) देईल.

९. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असूनही या योजनेंतर्गत दि.३०/११/२०१९ पर्यत सहभागी न झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नोंदणी थेट राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमध्ये उपरोक्त अ (ii) /ब (ii) प्रमाणे करण्यात यावी.

१०. प्रतिनियुक्तीने रुजू झालेले शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी :- ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ संवर्गात PRAN क्रमांक पूर्वी त्यांचे राज्य अभिलेख देखभाल अभिकरणामार्फत कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (PRAN) प्राप्त झालेला आहे, जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनियुक्तीने जिल्हा परिषदेतून मान्यताप्राप्त खाजगी शाळेतील १००% अनुदानित पदावर त्याचप्रमाणे मान्यताप्राप्त खाजगी शाळेतील १००% अनुदानित पदावरुन जिल्हा परिषद मध्ये रुजू झाल्यास त्यांचे PRAN क्रमांक तेच राहतील. त्यांच्या अंशदानाची निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाने केंद्रीय अभिलेख अभिकरणास ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे रक्कम अदा करण्याची जबाबदारी ते ज्या कार्यालयातून वेतन घेतील त्या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची राहील.

वर नमूद केलेल्या अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या अंशदानाच्या संदर्भात संबंधित सबस्क्रायबर कॉन्ट्रीब्युशन फाईल्स (SCF) तयार करण्याची तसेच त्या केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरणाच्या संगणक प्रणालीमध्ये अपलोड करण्याची जबाबदारी संबंधित उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी / शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) (DTO) यांची राहिल.

११. केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाने कर्मचाऱ्याला कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (Permanent Retirement Account Number- PRAN) देणे :-

११.१ वरील प्रमाणे कर्मचा-याची माहिती नमुना फॉर्म सीएसआरएफ(CSRF) मध्ये प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक कर्मचाऱ्याला केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून एक कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांक (PRAN) देण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याला एक प्रान किट दिली जाईल. प्रान क्रमांक व प्रान किट कर्मचाऱ्याच्या संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना पाठविण्यात येईल. संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्रान किट सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना वितरीत करावी. प्रत्येक कर्मचाऱ्याने प्रान किट वरील तपशीलाची खात्री करावी, त्यातील माहितीची अचूकता तपासावी, तसेच टी-पीन (Telephonic Personal Identification Number) व आय-पीन (Internet Personal Identification Number) उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. त्या संदर्भात अडचणी असल्यास अशा कर्मचाऱ्यांनी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाशी थेट संपर्क साधावा.

कर्मचाऱ्याकडून प्रानकिट गहाळ झाल्यास अथवा कर्मचाऱ्याच्या चुकीमुळे प्रानकिट मधील तपशील चूकीचा असल्यास दुबार प्रानकिटचे शुल्क हे कर्मचाऱ्यास अथवा ज्याच्यामुळे तपशीलात चूक झाली त्या संबंधितांकडून शुल्क वसुली केली जाईल. इतर प्रशासकीय प्रकरणी या बाबतीत शालेय शिक्षण विभागाने केलेल्या कराराप्रमाणे विहित शुल्क केंद्रीय अभिलेख अभिकरणास वित्त विभागाने ठरविलेल्या दराप्रमाणे अदा करेल.

११.२ पूर्वीच्या सेवेत ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना PRAN क्रमांक प्राप्त झाला आहे, असा कर्मचारी पूर्वीची सेवा सोडून जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील सेवेत रुजू झाल्यास त्याला पूर्वी मिळालेला PRAN क्रमांक IRA (Individual Retirement Account) compliant आहे अथवा नाही त्याची तपासणी करण्याची जबाबदारी तो कर्मचारी ज्या कार्यालयात नियुक्त होईल त्या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांची राहील.

११.३ कोणताही शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या अन्य कार्यालयात पदोन्नतीने, पदावनतीने अथवा बदलीने किंवा इतर कोणत्याही कारणामुळे स्थानांतरीत झाल्यानंतरही एकदा दिलेला कायम निवृत्तीवेतन लेखा क्रमांक (PRAN) बदलणार नाही. या प्रान (PRAN) क्रमांकाची नोंद संबंधीत कर्मचाऱ्यांच्या वेतन देयक नोंदवहीमध्ये त्याच्या नावासमोर तसेच त्याच्या सेवा पुस्तकात न चुकता घेण्यात यावी.

१२. दिनांक १/१२/२०१९ पूर्वी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेले अंशदान व नियोक्त्याचे अंशदान या रकमा विश्वस्त बँकेकडे वर्ग करणे :-

जिल्हा परिषद व मान्यता प्राप्त खाजगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या एकूण रकमांचा मेळ घेतल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता डिटीओ (DTO) यांनी व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याची (DDO) यांनी दिनांक १/१२/२०१९ पर्यंत प्राप्त झालेल्या रकमांचा ताळमेळ घेतल्यानंतर कर्मचाऱ्यांचे अंशदान आणि शासनाचे/नियोक्त्याचे सममूल्य अंशदान तसेच या दोन्ही रकमांवरील व्याज आहरित करण्याकरीता साधी पावती "नमुना-४५ अ" मधील देयक कोषागारावर सादर करावे. अशा देयकासोबत कर्मचाऱ्यांची यादी जोडण्याची आवश्यकता नाही. सदर एकूण रक्कम शासनाच्या लेख्यात खर्ची टाकण्यात यावी. अशा खर्चाकरीता वापरावयाच्या लेखाशिर्षासंबंधी शासन आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

१३. दिनांक १/१२/२०१९ नंतर मासिक अंशदानाची वसुली :-

१३.१ राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजने अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या अंशदानाची वसुली तसेच नियोक्त्याच्या अंशदानाचे आहरण प्रत्येक महिन्यात अनिवार्यरित्या करण्याची जबाबदारी संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांची राहील.

१३.२ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेखालील कर्मचाऱ्यांच्या अंशदानाची वसूली आणि त्यावरील शासनाची / नियोक्त्याची सममुल्य अंशदानाची रक्कम आहरित करण्याबाबतची कार्यवाही वेतन देयकातून एकाच वेळी करण्यात यावी. ज्या लेखाशिर्षामधून संबंधित कर्मचाऱ्याचे वेतन आहरीत केले जाते, त्याच लेखाशिर्षामधून नियोक्त्याचे अंशदान आहरित करण्यात यावे. तसेच दोन्ही प्रकारच्या अंशदानाची रक्कम व तपशील दर्शविणारी अनुसूची वेतन देयकासोबत जोडण्यात यावी. **दोन्ही अंशदानाच्या रकमा प्रत्येक महिन्यात अनिवार्यरित्या वसुल करण्याची जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांची असेल.**

१३.३ सदर रकमा जमा करण्यासाठी डिटीओ (DTO) यांनी वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक डीडीओ-१००५/प्र.क्र.५/कोषा प्रशा-५, दिनांक २९ ऑगस्ट, २००५ सोबत जोडलेल्या जोडपत्र-१ मधील कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने सोईस्कर होईल अशा कोणत्याही एका बँकेत स्वतंत्र चालू खाते उघडावे.

१३.४ डिटीओ (DTO) यांच्या बँक खात्याचा क्रमांक आहरण व संवितरण अधिकारी यांनी वेतन देयकातील कर्मचारी अंशदान व नियोक्त्याचे अंशदान या अशासकीय वसूली दर्शवून सीएमपी मार्फत जमा करण्यासाठी शालार्थ प्रणालीमध्ये मॅपिंग करावा. आहरण व संवितरण अधिकारी यांनी बनविलेल्या तपशिलवार वेतन देयकात कर्मचारी निहाय राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अंतर्गत कर्मचाऱ्याचे अंशदान व नियोक्त्याचे अंशदान या कपाती दर्शविण्यात याव्यात. संबंधित रकमा व त्याचे लेखे डिटीओ (DTO) यांच्या नावे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठी असलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा कराव्यात.

१४. अंशदानाचा तपशील इलेक्ट्रानिक पध्दतीने(SCF द्वारे) केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाकडे पाठविणे :-

१४.१ कर्मचाऱ्यांच्या अंशदानाच्या व नियोक्त्याच्या सममूल्य अंशदानाच्या रकमेचा ताळमेळ घेतल्यानंतर जिल्हा परिषद व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता डिटीओ (DTO) यांनी त्या महिन्याच्या ०१ तारखेपासून १८ तारखेपर्यंतच्या देयकांमधील वसूली संदर्भात अंशदानाचा (कर्मचारी / अधिकारी व नियोक्त्याचे अंशदान यासह) आवश्यक तो संपूर्ण तपशील दर्शविणारी माहिती सबस्क्रायबर कॉन्ट्रीब्युशन फाईल (SCF) च्या स्वरूपात तयार करून केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाच्या संगणक प्रणालीमध्ये त्या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत अपलोड (Up-Load) करावी. त्या महिन्याच्या १९ ते महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंतच्या् देयकामधील वसूली संदर्भात पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत एससीएफ (SCF) तयार करुन ती केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाच्या संगणक प्रणालीमध्ये अपलोड करावी. याशिवाय आवश्यकतेनुसार डिटीओ (DTO) एका पेक्षा जास्त वेळा एससीएफ (SCF) तयार करुन ती अपलोड करु शकतील. मात्र अशा वेळी ट्रस्टी बँकेकडे पाठवावयाच्या रकमा, व्यवहार क्रमांक (Transaction ID) प्राप्त झाल्यापासून दहा कामाच्या दिवसांच्या आत विश्वस्त बँके कडे पाठविणे आवश्यक राहील. अशाप्रकारे वसूल केलेल्या रकमा गुंतवणुकीकरीता नेमण्यात आलेल्या निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकांकडे पाठविण्यात येणार असल्याने सदर कालमर्यादा पाळण्याची जबाबदारी जिल्हा परिषद व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता संबंधित डिटीओ (DTO) यांच्यावर राहील.

१४.२ केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण अशा प्रत्येक फाईलकरीता एक व्यवहार क्रमांक (Transaction ID) देतील व तो संबंधित जिल्हा परिषद व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता संबंधित डिटीओ (DTO) यांना कळवतील.

१५. अंशदानाची रक्कम विश्वस्त बँकेकडे जमा करणे :-

१५.१ निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांचेकडून ॲक्सीस बँक (Axis Bank) या बँकेस महाराष्ट्र शासनाकरीता विश्वस्त बँक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. वेळोवेळी निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांचेकडून निश्चित केलेली बँक विश्वस्त बँक म्हणून काम करेल.

१५.२ केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्या संगणक प्रणालीमध्ये अपलोड (Up-Load) केलेल्या सबस्क्रायबर कॉन्ट्रीब्युशन फाईल (SCF) मधील तपशिलामध्ये दर्शविण्यात आलेल्या सर्व कर्मचा-यांची संपूर्ण रक्कम (कर्मचा-यांचे अंशदान व शासनाचे/नियोक्त्याचे सममूल्य अंशदान) जिल्हा परिषद व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरिता संबंधित डिटीओ (DTO) यांनी वर परिच्छेद क्रमांक १४ मध्ये नमुद केलेल्या विहित वेळापत्रकाप्रमाणे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने अथवा धनादेशाव्दारे विश्वस्त बँकेकडे (Axis Bank) हस्तांतरीत करावी. त्यात केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरणाने दिलेल्या व्यवहार क्रमांकाची (Transaction ID) नोंद न चुकता करण्यात यावी.

१५.३ निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाकडून (PFRDA) नियुक्त केल्या जाणाऱ्या व राज्य शासनाने याकरीता नामनिर्देशित केलेल्या निवृत्तीवेतन निधी व्यवस्थापकाकडे (Pension Fund Manager-PFM) गुंतवणूकीकरीता सदरची रक्कम विश्वस्त बँकेकडून हस्तांतरीत करण्यात येईल.

१६. सेवाशुल्क :-

१६.१ या योजनेअंतर्गत केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून दिल्या जाणाऱ्या सेवेसाठी राज्य शासनाने त्यांच्याशी केलेल्या करारानुसार PRAN Opening Rs.३०/-, Annual PRAN Maintenance Rs.९५/-, Transaction Charges Rs.३.७५ अधिक अनुज्ञेय सेवा कर केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरणास अदा केले जाईल. सदर सेवा शुल्कामध्ये वित्त विभागाने वेळोवेळी केलेल्या सुधारणा लागू राहतील.

१६.२ केंद्रीय अभिलेख देखभाल अभिलेख देखभाल अभिकरण सदर सेवांचे त्रैमासिक देयक DTA च्या नांवे देतील. त्या करिता प्रत्येक डीटीओ (DTO) त्यांच्याकडून संबंधित महिन्यांत केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणासोबत केलेल्या व्यवहाराची संख्या केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणाने सादर केलेल्या देयकाची उपलब्ध असलेल्या अभिलेख्याशी ताळमेळ घेऊन तपासणी करावी. सदरच्या देयकाची अदायगी देयक प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत डीटीओंकडून (DTO) केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरणास करण्यात येईल. अशा खर्चाकरीता वापरावयाच्या लेखाशीर्षासंबंधी शासन आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. डीटीओ (DTO) यांना सदरच्या निधीची रक्कम आहरीत करण्याकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

१७. ताळमेळ :-

या योजनेखालील रकमांचा मासिक व त्रैमासिक ताळमेळ डीटीओ (DTO) कडून विश्वस्त बँकेत पाठविलेल्या रकमांशी घेण्याची जबाबदारी डीटीओ (DTO) यांची राहील. डीटीओ (DTO) कडे हस्तांतरीत केलेल्या रकमांचा ताळमेळ घेण्याची जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

१८. संकीर्ण सूचना :-

१८.१ एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात/व्यवस्थापनात बदलीने नियुक्त होणाऱ्या, त्याच कार्यालयात/व्यवस्थापनात पदोन्नतीने अथवा पदावनतीने किंवा इतर प्रशासकीय कारणामुळे बदलीने दुसऱ्या पदावर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण ११०१/सं.क्र.१७/कोषा प्रशा-५, दिनांक १५/१०/२०१३ मधील परिच्छेद क्रमांक २ व ३ मधील तरतूदीनुसार त्या महिन्यात कर्मचारी कार्यमुक्त होत आहे, त्या महिन्याचे वेतन, तो त्या महिन्यातील कोणत्याही दिनांकास कार्यमुक्त झाला असला तरीही त्याच्या संबंधित

महिन्याच्या वेतनाचे पूर्ण देयक त्याच्या जुन्या अथवा नवीन कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी अदा करणे अनिवार्य आहे. एका महिन्याच्या वेतनातून एकाहून जास्त वेळा या योजनेखालील कपाती केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून स्वीकारल्या जाणार नाहीत. त्यामुळे आहरण व संवितरण अधिकारी आणि कोषागार अधिकारी यांनी याबाबत दक्ष राहून योग्य ती काळजी घ्यावी.

१८.२ ज्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी PRAN क्रमांक प्राप्त झालेले नाहीत व ज्यांच्या प्रणालीतील माहितीमध्ये missing credit, रकमांचे चुकीचे वर्गीकरण झाले आहे, अशा प्रकरणी संबंधित डीटीओ (DTO) यांना संपर्क साधून झालेली चूक सुधारित करण्याची जबाबदारी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांची राहिल.

१८.३. वजाती होणाऱ्या जादा/ कमी अंशदानासंदर्भात अंमलात आणावयाची कार्यपद्धती :- विहित केलेली १०% (मुळ वेतन + त्यावरील महागाई भत्ता) अंशदानाची रक्कम कर्मचाऱ्याच्या वेतन देयकातून दरमहा वसूल करणे आणि नियोक्त्याचे १०% सममूल्य अंशदान दरमहा जमा करणे याकरिता आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार राहिल. कर्मचाऱ्याच्या खात्यात अंशदानापोटी जादा रक्कम जमा करण्यात आल्यास ती लगतच्या पुढील महिन्यात समायोजित करण्याकरिता संबंधित शाळेतील मुख्याध्यापक/प्राचार्य व आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार राहतील. तसेच कमी रक्कम जमा करण्यात आल्यास आवश्यक रक्कम लगतच्या पुढील महिन्यात जमा करण्याकरिता संबंधित शाळेतील मुख्याध्यापक/प्राचार्य व आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार राहतील.

१८.४ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्यात येत असलेले अंशदान योग्य असल्याची खात्री दरमहा करण्याची जबाबदारी कर्मचाऱ्याची राहिल. त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याबाबत कर्मचाऱ्याने आहरण व संवितरण अधिकाऱ्यास लेखी निवेदन देणे आवश्यक आहे. लेखी निवेदन न दिल्यास त्यासंदर्भातील कोणत्याही तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१८.५. अनधिकृत अनुपस्थिती, असाधारण रजा प्रकरणी कर्मचाऱ्याच्या वेतनाचे देयक शालार्थ प्रणालीतून काढण्यात येणार नाही याची खात्री करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहिल. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम २६४ आणि २६५ मधील तरतुदींचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकाऱ्याची राहिल. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण १००९/प्र.क्र.३९/कोषा-प्रशा-५, दिनांक ४/१०/२०१३ व त्यासोबतच्या जोडपत्रातील तरतुदीनुसार शालार्थ प्रणाली अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत राज्य नियंत्रण अधिकारी यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात. या नियमांचे पालन न झाल्यास आहरण व संवितरण अधिकारी आणि कोषागार अधिकारी हे प्रशासकीय कारवाईसाठी पात्र ठरतील.

१८.६ कर्मचाऱ्यांच्या कायम निवृत्तीवेतन खाते क्रमांकासंबंधीचे (PRAN) वार्षिक विवरणपत्र दरवर्षी केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरणाकडून संबंधित कर्मचाऱ्यास परस्पर पाठविण्यात येईल. तसेच कोणत्याही वेळी संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यामधील जमा रकमेचा तपशील नोंदणी केलेल्या कर्मचाऱ्यांस त्यांच्या संकेतस्थळावर पाहण्याची व्यवस्था केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरण उपलब्ध करुन देईल.

१८.७. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या दिनांक ३०/११/२०१९ पर्यंतचे अंशदानाच्या रकमा परत करण्याबाबतची प्रकरणे शासन निर्णय दिनांक २०/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार निकाली काढावेत. तसेच दिनांक ०१/१२/२०१९ पासून पुढे अशा प्रकारच्या परताव्याच्या प्रकरणांवर केंद्रिय अभिलेख देखभाल अभिकरणाने कार्यवाही करावी.

१९. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्र.१०२/२०१९/सेवा-४, दिनांक २० ऑगस्ट, २०१९ व ग्राम विकास विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्र.1/२०१९/वित्त-५, दिनांक १२ जुलै, २०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

२०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१९२२११४६४१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Devendra Chaudhari

Digitally signed by Charushila Devendra Chaudhari
DN: CN = Charushila Devendra Chaudhari, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.09.20 14:30:15 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,	२०. * प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,	२१. * प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/ नागपूर/ औरंगाबाद
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,	२२. मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र, मुंबई,
४. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,	२३. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला,मंत्रालयासमोर,मुंबई ४०००३२.
५. संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई,	२४. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
६. उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, नवीन प्रशासकीय भवन,५ वा मजला, मंत्रालयासमोर,मुंबई ३२,	२५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथपाल,सहावा मजला, विधान भवन,मुंबई-४०००३२. (१० प्रती),
७. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई,	२६. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
८. संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय,मुंबई,	२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे /नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक	२८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१०. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई	२९. सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी,
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी	३०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई,	३१. शिक्षण संचालक (प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३. राज्यपालांचे सचिव,	३२. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
१४. मुख्य मंत्र्यांचे सचिव,	३३. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (शिक्षण)
१५. उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,	३४. शिक्षण निरीक्षक, बृहनमुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
१६. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,	३५. शिक्षणाधिकारी (सर्व)
१७. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा),मुंबई,	३६. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/ माध्यमिक)
१८. * प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,	३७. निवडनस्ती.
१९. * सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,	

CENTRAL RECORDKEEPING AGENCY

DIRECTORATE OF TREASURY AND ACCOUNTS REGISTRATION FORM

(To avoid mistake(s), please read the accompanying instructions carefully before filling up the form)

This form is to be used for the purpose of registration of Directorate of Treasury and Accounts (DTA) and equivalent entities in State Governments and Union Territories.

DTA Registration Number : ☐☐☐☐☐☐☐
(To be allotted by CRA)

We are pleased to inform you that our Directorate of Treasury and Accounts has decided to join the National Pension System. The details required for registration in the CRA system are provided below:

1. DTA AIN (Optional): ☐☐☐☐☐☐☐ (Refer to instruction No.6)

2. Name of Office*:

3. Office Address *:
   - Flat/Unit No, Block no. *
   - Name of Premise/Building/Village
   - Area/Locality/Taluka
   - District/Town/City *
   - State / Union Territory *
   - Country *
   - Pin Code * ☐☐☐☐☐☐
   - Phone No. * (STD code) (Phone No.)
   - Alternate Phone No:
   - Fax No:

4. Official Email ID* (Refer to instruction No.7)

5. Authorised contact person's designation *:

6. No. of DTOs attached*:

7. Name of the State Govt. / Union Territory*:

Directorate of Treasury and Accounts Office stamp & signature of authorised signatory

8. Bank Details*: [Designated Bank Account for NPS] [Refer instruction no. 4]

Bank Account Type* Savings A/c ☐ Current A/c ☐

Bank A/c Number *

Bank Name*

Bank Branch*

Bank Branch Address*

Pin Code*

Bank Branch MICR Code*

Bank Branch IFSC (Indian Financial Systems Code)

I/We hereby agree and declare that the information provided in the application, is complete and true.

I/We understand that there would be PFRDA approved ***Terms and Conditions*** on the CRA website ***governing Nodal Office's use of I-Pin (to view and transact online) to access CRA / NPSCAN***. I/We agree to be bound by the said terms and conditions and understand that CRA may, as approved by PFRDA, amend any of the services completely or partially without any new Declaration/Undertaking being signed.

	Signature of Authorised Signatory
Directorate of Treasury and Accounts Stamp	**Name:** ____________ **Place:** ____________ **Designation:** ____________ **Date:** ____________

(To be filled at CRA)	**Received on** ____________ **Name of the officer:** ____________ **Signature of the officer**: ____________
CRA Stamp	

Instructions for filling the form:

1. The form is to be submitted to the address – Central Recordkeeping Agency, NSDL e-Governance Infrastructure Limited, Times Tower, 1st Floor, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel (W), Mumbai – 400013.
2. Form to be filled legibly in BLOCK LETTERS and in BLACK INK only.
3. The form should be filled up completely. Details marked with (*) are mandatory fields.
4. **Bank details are mandatory if the DTA will remit the NPS contributions to the Trustee bank (Bank of India) on behalf of District Treasury offices (DTOs)**
5. Each box, wherever provided, should contain only one character (alphabet/number/punctuation mark) leaving a blank box after each word.
6. AIN is Account Office Identification Number allotted by Income Tax Department.
7. Email ID should be official Email ID of the Directorate of Treasury and Accounts office & not of any individual person.
8. The application form in the prescribed format can be freely downloaded from the CRA website (http://www.npscra.nsdl.co.in).
9. For more information contact CRA at 022-24994200 or write to CRA at NSDL e-Governance Infrastructure Limited, Times Tower, 1st Floor, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel (W), Mumbai – 400013.

CENTRAL RECORDKEEPING AGENCY

DISTRICT TREASURY OFFICE REGISTRATION FORM

(To avoid mistake(s), please read the accompanying instructions carefully before filling up the form)

This form is to be used for the purpose of registration of District Treasury Office (DTO) and equivalent entities in State Governments and Union Territories.

DTO Registration Number: ☐☐☐☐☐☐☐
(To be allotted by CRA)

We are pleased to inform you that our District Treasury Office has decided to join the National Pension System. The details required for registration in the CRA system are provided below:

1. DTO AIN (Optional): ☐☐☐☐☐☐☐ (Refer instruction no. 5)

2. Name of the Office*:

3. Office Address*:
   - Flat/Unit No, Block no.*
   - Name of Premise/Building/Village
   - Area/Locality/Taluka
   - District/Town/City*
   - State / Union Territory*
   - Country*
   - Pin Code* ☐☐☐☐☐☐

Phone No.*: (STD code) (Phone No.)

Alternate Phone Number:

Fax Number:

4. Official Email ID*: (Refer instruction no.6)

5. Authorised contact person's designation*:

6. Existing DTO code*: ☐☐☐☐☐☐
   (Refer instruction no. 7)

7. DTA Registration Number*: ☐☐☐☐☐☐☐
   (Refer instruction no. 8)

8. Name of the State Govt. / Union Territory*:

DTO stamp &
Signature of Authorised signatory

9. Bank Details*: [Designated Bank Account for NPS] [Refer instruction no. 4]

Bank Account Type* Savings A/c ☐ Current A/c ☐

Bank A/c Number *

Bank Name*

Bank Branch*

Bank Branch Address*

Pin Code*

Bank Branch MICR Code*

Bank Branch IFSC (Indian Financial Systems Code)

I/We hereby agree and declare that the information provided in the application, is complete and true.

I / We understand that there would be PFRDA approved ***Terms and Conditions*** on the CRA website ***governing Nodal Office's use of I-Pin (to view and transact online) & T-pin to access CRA / NPSCAN***. I /We agree to be bound by the said terms and conditions and understand that CRA may, as approved by PFRDA, amend any of the services completely or partially without any new Declaration/Undertaking being signed.

DTO Stamp	**Signature of Authorised signatory of DTO** **Name:** ________________________ **Place:** _______ **Designation:** __________________ **Date:** ________
DTA Stamp **DTA Reg. No.** **(Allotted by CRA)** (Refer instruction no.8)	**Signature of Authorised signatory of DTA** **Name:** ________________________ **Place:** ________ **Designation:** __________________ **Date:** ______
(To be filled at CRA) **CRA Stamp**	**Received on :** _____________________ **Name of the officer :** __________________ **Signature of the officer :** ________________

Instructions for filling the form:

1. The form is to be submitted to the address - Central Recordkeeping Agency, NSDL e-Governance Infrastructure Limited, Times Tower, 1st Floor, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel (W), Mumbai – 400013.
2. Form to be filled legibly in BLOCK LETTERS and in BLACK INK only.
3. Each box, wherever provided, should contain only one character (alphabet/number/punctuation mark) leaving a blank box after each word. **Details marked with (*) are mandatory fields.**
4. **Bank details are mandatory if the DTO will remit the NPS contributions to the Trustee bank (Bank of India)**
5. AIN is the Account Identification Number allotted by Income Tax Department.
6. Email ID should be the official Email ID of the DTO & not of any individual person.
7. Kindly mention the DTO code allotted by the respective State Government / Union Territory. If DTO code is less than six digits, prefix zeros to make a six digit number. For e.g. | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 8 |
8. Kindly mention DTA Reg. No. allotted by CRA to the Directorate of Treasury and Accounts.
